स्थापना] १-७-१९९१

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

रजिस्टर नं. बी. ओ. एम./डब्लु. डी./आर. एस. आर./सी. आर./४१५-९१/९२
(कार्यक्षेत्र बृहन्मुंबई)

## ४ था वार्षिक अहवाल

## १९९४ - ९५

---

**कार्यालय**

१०, अतुल निवास, खेतवाडी ७ वी गल्ली,
मुंबई-४०० ००४.

**: कामकाजाची वेळ :**

सकाळी ८-३० ते दुपारी १२-३०
सायंकाळी ४ ते ८
दुरध्वनी : ३८२ ४५ ४३

: आमचे श्रध्दास्थान :



स्व. मा. रावसाहेब भाऊसाहेब वांगडे (मास्तर)

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## : सभा सुचना :

पतसंस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ६-८-१९९५ रोजी सकाळी ठिक १० वाजता संस्थेचे कार्यालय १०, अतुल निवास, खेतवाडी ७ वी गल्ली मुंबई-४. या ठिकाणी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

## : सभेपुढील विषय :

१) मागील सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचुन कायम करणे.

२) ३१ मार्च १९९५ अखेर संपणाऱ्या वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे.

३) सन १९९५-९६ करीता अंतर्गत हिशेब तपासणीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरवणे.

४) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे.

५) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे अन्य विषय.

मुंबई
दिनांक २१-७-१९९५

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**श्री. भरत शिवराम पिंपळे**
(चिटणीस)

## : विशेष सुचना :

१) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी विषय पत्रिकेत नमुद केलेल्या विषयांचा विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. सदर सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) संस्थेच्या कामकाजा विषयी प्रश्न किंवा ठराव मांडावयाचे असल्यास दिनांक २५-७-९५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे.

३) सभासदांनी सभेस येताना अहवालाची प्रत सोबत आणावी.

४) भाग दाखले पतसंस्थेच्या कार्यालयात तयार आहेत. कृपया भाग खरेदीची पावती दाखवून घेऊन जावे.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## 卐 कार्यकारी मंडळ 卐

(१९९१ ते १९९६)

संस्थापक अध्यक्ष : श्री. ज्ञानेश्वर बापुसाहेब वांगडे (S.E.M.)
उपाध्यक्ष : श्री. रामचंद्र बळीराम वाईकर
चिटणीस : श्री. भरत शिवराम पिंपळे
खजिनदार : श्री. रामचंद्र धोंडीबा वांगडे

-: संचालक :-

श्री. शंकर विश्राम आरगडे
श्री. प्रकाश तुकाराम निकम
श्री. विनोद केशव पितळे
श्री. सुरेश भाऊसो पवार
श्री. बबन ज्ञानू पाटील
सौ. दया सुरेश शेलार
श्री. नारायण रामचंद्र सोनावणे

-: लेखापरिक्षक :-

मे. एस. आर. घेडिया आणि कंपनी
(बी. कॉम, एफ. सी. ए. चार्टड अकाऊन्टट)

-: कर्मचारी :-

कु. सुभाष तुकाराम माने
कु. किशोर सदाशिव साळुंखे
सौ. मंजिरी मंगेश शिगवन

-: कायदेविषयक सल्लागार :-

ॲड. श्री. संजय व्ही. गोळे
(बी.कॉम.एल.एल.बी.)

-: दैनंदिन बचत एजंट :-

श्री. दशरथ रामचंद्र वांगडे
कु. संजय पांडूरंग जांभळे
कु. सुभाष तुकाराम माने
श्री. संजय दादा शेडगे
सौ. जयश्री शंकर सुर्यवंशी

-: बँकर्स :-

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमीटेड, पलटन रोड शाखा मुंबई
दि सातारा सहकारी बँक लिमीटेड, कुंभारवाडा शाखा मुंबई

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई–४०० ००४.

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो.**

आपल्या पतसंस्थेच्या वार्षिक सर्व साधारण सभेच्या शुभ प्रसंगी सर्वांचे मनपूर्वक स्वागत

आपल्या पतसंस्थेच्या दि. ३१–३–१९९५ रोजी संपणाऱ्या चौथ्या वर्षाचा वार्षिक अहवाल ताळेबंद नफा–तोटा पत्रक आपल्या मंजुरीसाठी सादर करताना कार्यकारी मंडळास अतिशय आनंद होत आहे.

अनेक अडचणीना तोंड देत आपली संस्था चौथ्या वर्षात यशस्वीरित्या पदार्पण करीत आहे. विशेष म्हणजे स्वःनिधीवर संस्थेचे कामकाज प्रगतीच्या दिशेने चालू आहे. सहकारी लेखा परिक्षकाने सन ९१–९२, ९२–९३ ९३–९४, ९४–९५ अखेर सलग चार वर्षे ऑडिट वर्ग 'अ' दिला आहे. तसेच संस्थेच्या चार वर्षाच्या यशस्वी कामगिरीचा एक भाग म्हणजे संस्थेने भाडेतत्वावर घेतलेले आपले कार्यालय स्वतत्र जागेत अंतत्य आकर्षक व सभासदांना उपयुक्त असे फर्निचर सह थाटले आहे. त्याचबरोबर संस्थेच्या दैनंदिन कामाचा वाढता व्याप संभाळण्या साठी संस्थेने स्वतंत्र दुरध्वनी घेतला आहे. आपल्या सर्वांचा सहभाग असल्यामुळे हे यश मिळाले हे खास नमुद करीत आहोत संस्थेकडे सभासदांची नेहमी कर्जासाठी मागणी होत असते. तरी संस्था सर्व आर्थिक व्यवहार व जबाबदाऱ्या संभाळून सभासदांना कर्ज पुरवठा चालू ठेवते. त्याच प्रमाणे कर्जदार सभासदांनी आपल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरुन दुसऱ्या गरजू सभासदांची गरज पूर्ण करण्याकरीता संस्थेस सहकार्य करावे म्हणजे संस्थेस प्रगतीचे शिखर गाठण्यास अवघड जाणार नाही.

**सूचना :** थकबाकीदार कर्जदारांनी आपली थकीत रक्कम संस्थेस त्वरीत भरणा करावी जेणेकरुन संस्थेला आपल्यावर वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करावी लागणार नाही. कायदेशीर कारवाईचा संपूर्ण खर्च हा कर्जाच्या रक्कमे बरोबरच वसुल केला जातो. हा भूर्दंड टाळण्यासाठी आपण आपली थकबाकी कर्तव्य भावनेने संस्थेस भरावी अशी आपणास माझी नम्र विनंती आहे.

आपला नम्र,

**श्री. ज्ञानेश्वर बापूसाहेब बांगडे**

संस्थापक अध्यक्ष

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई–४०० ००४.

## –: सन्माननीय सभासद बंधु–भगिनिंनो :–

आपल्या पतसंस्थेचा सन १९९४–९५ सालचा ४ था वार्षिक अहवाल दिनांक ३१–३–१९९५ अखेर संपणाऱ्या वर्षाचा ताळेबंद व नफा–तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

**संचालक मंडळ :—**

आपल्या संस्थेचे संचालक मंडळ ११ सदस्याचे आहे. तिसऱ्या वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झाल्या. प्रत्येक सभेस हजर राहीलेल्या सदस्यांची सरासरी ९०% पर्यंत आहे.

**भागधारक :—**

३१ मार्च १९९५ रोजी पतपेढीचे एकूण भाग धारक १२२७ झाले आहेत.

**भाग भांडवल :—**

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ५ लाख रुपये आहे. ३१ मार्च १९९५ अखेर पतसंस्थेने वसुल भाग भांडवल ३,८९,०५०/– रु. इतके झाले.

**सभासद कर्ज व्यवहार :—**

आज मिती पर्यंत संस्थेने गरजु सभासदांना वैयक्तीक जामीनावर मध्यम मुदतीची कर्जे दिली आहेत.

रुपये १६,३२,५३९/– इतके वर्षारंभी कर्ज सभासदांकडून येणे होते.

रुपये १७,७८,०००/– इतके अहवाल सालात सभासदांना कर्ज देण्यात आले.

रुपये ११,६३,८६८/– इतके अहवाल सालात सभासदांकडून कर्ज वसुल केले.

रुपये २२,४६,६७१/– इतके वर्ष अखेरीस सभासदांकडून कर्ज येणे बाकी आहे.

**ठेव :—**

ठेवीमध्ये सातत्याने होणारी वाढ ही ठेवीदारांच्या मनातील संस्थेच्या आदराचे विश्वसाचे प्रतिक होयं अहवाल साली संस्थेच्या विविध ठेव योजनामध्ये जमा झालेली रकम पुढील प्रमाणे.

| ठेवी | १९९१–९२ | १९९२–९३ | १९९३–९४ | १९९४–९५ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ५८,७०४.९७ | ६५,९३९.०१ | ७५,४५४.६१ | १०१,३०८.१६ |
| मुदत व दामदुप्पट | १५९,३००.०० | ३९६,४५०.०० | ७०१,०००.०० | ११,११,१००.०० |
| आवर्त ठेव | १३,२९७.०० | ३६,७३०.०० | ४६,८९५.०० | ९०,४१५.०० |
| दैनंदिन ठेव | १७४,५५५.०० | १४६,३००.०० | ४,३,९,५२०.०० | ५,४४,८१५.०० |
| सक्तीची बचत | २८,२४३.६३ | ७०,६९०.०८ | १६६,१२५.७५ | २७४,५८५.८० |

**नफा विनियोग :**

संस्थेची वसुली चांगली असुन संस्थेस अहवाल सालात एकुण रुपये ५२,०८०-४० इतका नफा झाला आहे. त्यात गतवर्षिचा शिल्लक नफा रुपये २३२२९-२२ आधिक करता एकुण रुपये ७५,३०९-६२ इतका नफा विनियोगासाठी उपलब्ध राहातो संचालक मंडळाने सदरहू नफ्याचा विनियोग पुढील प्रमाणे सुचविला आहे.

| | | |
|---|---|---|
| राखीव निधी : २५% | रुपये | १८,०००-०० |
| इमारत निधी : २५% | रुपये | १८,०००-०० |
| बुडीत कर्ज निधी : २५% | रुपये | १८,०००-०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | रुपये | २१,३०९-२२ |
| | | ७५,३०९- २२ |

## ❀ आभार ❀

आपली पतसंस्था प्रगतीपथावर नेण्यासाठी ज्या सभासद, ठेवीदार खातेदार व हितचिंतक यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे मनः पूर्वक आभार परंतु प्रामुख्याने ज्यांनी वेळोवेळी मार्गदशन केले त्या मान्यवरांचे आम्ही शतश ऋणी आहोत.

**श्री. अभयसिंहराजे भोसले** : माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य.

**मा. भालचंद्र सावंत** : अध्यक्ष मुंबई बँक

**श्री. अशोकराव गजरे** : संचालक मुंबई बँक

**श्री. अशोकराव शेटे** : अध्यक्ष सातारा सहकारी बँक लि.

**श्री. शिवाजीराव नलावडे** : संचालक मुंबई बँक

**श्री. प्रतापराव साळुंखे** : संचालक मुंबई बँक

**श्री. बाबुराव रामिष्टे** : सरचिटणीस अखिल भा. माथाडी कामगार युनियन **श्री. दिनकर भाऊ पाटील** ऊर्फ पोपट शेट, अध्यक्ष : शिवसागर सहकारी पतपेढी **वसंतराव देशमुख** संचालक मुंबई सहकारी बोर्ड **श्री. मोहनराव कदम : संचालक** मुंबई सहकारी बोर्ड **श्री. ठाकरे** : जॉइंट रजिस्टर, **श्री. सुदर्शन साहेब** जिल्हा उपनिबंधक **श्री. जगन्नाथ जाधव** : अध्यक्ष परळी विभाग सहकारी पतपेढी, **श्री. सर्जेराव डांगरे** चिटणीस परळी विभाग सहकारी पतपेढी **श्री. मारुतराव शिंदे** अध्यक्ष कुशल को. क्रेडिट सोसा. **श्री. यादवराव भोसले** : उपाध्यक्ष कुशल को. क्रेडिट सोसा. जनार्दन बोत्रे, सुरेश शेलार, आनंदराव गोळे, सिताराम कासुर्डे, अनिल निकम, तात्यासाहेब केरेकर, किरण जांभळे, ज्ञानेश्वर वांगडे, (बुवा) नवनाथ सुतार (मेस्त्री) प्रताप वांगडे, सातारा सहकारी बँक अधिकारी व कर्मचारी, परळी विभाग शेतकरी संघ, उरमोडी धरणग्रस्त कृती समिती इतर मान्यवर बँक पतसंस्था यांचे आम्ही आभारी आहोत.

**श्रध्दांजली**

आपल्या पतसंस्थेचे आदरणीय सभासद कै. गणपत सावजी वांगडे, कै. विष्णु कृष्णा वांगडे व मनोहर रामचंद्र काळोखे (भाई) यांस भावपूर्ण श्रध्दांजली तसेच संस्थेचे ज्ञात अज्ञात मृत आत्म्यांस शांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

मुंबई दिनांक १-५-१९९५

**श्री. भरत शिवराम पिंपळे**

चिटणीस

# शिवसह्याद्री सहकारी

खेतवाडी

ताळेबंद पत्रक

| ३१ मार्च १९९४ रु. पैसे | भांडवल देणे | | ३१ मार्च १९९५ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **भाग भांडवल** | | |
| ५,००,०००-०० | अधिकृत भाग भांडवल | | ५,००,०००-०० |
| | (प्रत्येकी १० रु. चे ५०००० भाग) | | |
| | वसुल भाग भांडवल | | |
| २८,६,४००-०० | (प्रत्येकी १० रु. चे ३९८०५ भाग) | | ३,९८,०५०-०० |
| | **राखीव व इतर निधी** | | |
| ५९६-०० | प्रवेश शुल्क | ९६५-०० | |
| ६१,८४०-१० | इमारत निधी | १०२६२०-०० | |
| १८०७७-०० | राखीव निधी | ४१,०७७-०० | |
| १६,०००-०० | बुडीत कर्ज निधी | ३९,०००-०० | १,८३,६६२-०० |
| | **ठेवी** | | |
| ७५,४५४-६१ | बचत ठेव | १,०१,३०८-१६ | |
| १,६६,१२५-७५ | सक्तीची बचत ठेव | २,७४,१८५-८० | |
| ४६,८९५-०० | आवर्त ठेव | ९०,४१५-०० | |
| ७,०१०००-०० | मुदत ठेव | ११,११,१००-०० | |
| ४,३९,५२०-०० | दैनंदिन बचत ठेव | ५,४४,८१५-०० | २१,२१,८२३-९६ |
| | **इतर देणी व तरतूदी** | | |
| २,७५६-८० | आवर्त ठेव व्याज | ८,२९९·८५ | |
| ५०,०७१-९५ | मुदत ठेव व्याज | १,२६,०७७-१० | |
| ८,१३४-५५ | दैनंदिन बचत ठेव व्याज | २१,४१८-६५ | |
| २५००-०० | अंतर्गत हिशोब तपासनी फी | | |
| | सरकारी हिशोब तपासणी फी | ३,८९६-०० | |
| ५००-०० | शिक्षण निधी | २९००-०० | |
| ३००-०० | मुंबई सहकारी बोर्ड वर्गणी | ६०-०० | १,६२,६५१-६० |
| | **नफा-तोटा खाते** | | |
| | मागील शिल्लक नफा | २३,२२९-२२ | |
| १२,२२९-२२ | अधिक चालु वर्षाचा नफा | ५२,०८०-४० | ७५,३०९-६२ |
| १९,६८४००-८८ | एकुण | | २९,४१,४९७-१८ |

ठिकाण : मुंबई

दिनांक २७-४-१९९५

माझ्या आज रोजीच्या अहवाला प्रमाणे

मे. एस. आर घेडिया ( शासकीय लेखा परिक्षक)

## पतपेढी मर्यादित

मुंबई–४०० ००४.

३१ मार्च १९९५ अखेर

| ३१ मार्च १९९४ रुपये पैसे | जिंदगी व येणे | १९९४-९५ | ३१ मार्च १९९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँकेतील शिल्लक** | | |
| २७६१–४२ | हातातील रोख शिल्लक | ३९९-४७ | |
| १९,८६२–५१ | मुंबई बँक चालू खाते | १०,४३७४–२१ | |
| | सातारा सहकारी बँक लि. | २७,८८८–८० | १,३२,६६२–४८ |
| | **गुंतवणूक** | | |
| | मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. | | |
| १००–०० | ( रुपये १०/– चा एक भाग ) | १००–०० | १००–०० |
| | **कर्ज** | | |
| १६,३२,५३९–०० | मध्यम मुदत कर्ज | २२,४६,६७१–०० | |
| १,५२,१३०–०० | ठेव तारण कर्ज | ३,२८,९२८–०० | २५,७५,५९९–०० |
| | **इतर येणी** | | |
| ७२,९४८–९५ | कर्जावरील व्याज येणे | १,०६,०९८–२० | |
| ८,०५९–०० | स्टेशनरी स्टॉक | १०,९५९–९५ | |
| | ऑफिस डिपॉझिट | २५,०००–०० | |
| | टेलीफोन डिपॉझिट | ३,०००–०० | |
| | फर्निचर व फिक्चर | ८१,९६५–३५ | |
| | मालमत्ता खाते | ६,११२–२० | २,३३,१३५–७० |
| १९,६८,४००–८८ | एकूण | | २९,४१,४९७–१८ |

**श्री. ज्ञानेश्वर बापूसाो बांगडे**
अध्यक्ष

**श्री. रामचंद्र बळीराम वाईकर**
उपाध्यक्ष

**श्री. भरत शिवराम पिंपळे**
चिटणीस

**श्री. रामचंद्र धोंडीबा बांगडे**
खजिनदार

# शिवसह्याद्री सहकारी

खेतवाडी,

नफा-तोटा पत्रक

| १९९३-९४ रुपये पैसे | खर्च | | १९९४-९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **ठेवीवरील व्याज** | | |
| ४,३७८.६५ | आवर्त ठेव | ८,००५.२५ | |
| ४४,९४८.२० | मुदत ठेव | १०४,९३४,९० | |
| १९,०९४.५० | दैनंदिन बचत ठेव | २९,८८८.२० | |
| ४,४९९.७५ | बचत ठेव | ६,२५७.६० | |
| ११,३३५ ६७ | सक्तीची बचत ठेव | २०,१७२.५० | १६९,२५८.४५ |
| | **सेवक पगार व भत्ते** | | |
| १२,७००.०० | कर्मचारी पगार | १४,८००.०० | |
| १,२०३.०० | कर्मचारी बोनस | १,२००.०० | १६,०००.०० |
| | **इतर खर्च** | | |
| ८,५६८.२५ | किरकोळ खर्च | ३१,१९६.२५ | |
| १,०८५.०० | प्रवास खर्च | १,५१०.५० | |
| २६,८१४.०५ | दैनंदिन बचत एजंट कमीशन | २८,४३७.०० | |
| १४,४५३.६५ | स्टेशनरी खर्च | २४,२०५.९० | |
| — | शासकिय लेखापरिक्षण फी | १०,१८१.०० | |
| ३,५००.०० | अंतर्गत हिशेब तपासणी फी | ५००.०० | |
| ५००.०० | शिक्षण निधी | ४,४००.०० | |
| ५.०० | बँक चार्जेस | ५.०० | |
| १२१.२५ | टपाल खर्च | १८.०० | |
| — | विज खर्च | १,०५१.९० | |
| — | ऑफिस भाडे | १६,५००.०० | |
| | वकील फी | ३५०.०० | |
| ३००.०० | जाहिरात खर्च | ५,०००.०० | |
| | **घसारा** | १,५२२.४५ | १२४,८७८.०० |
| ९२,२२३.५८ | नफा ताळेबंद पत्रकाकडे वर्ग | | ५२,०८०.४० |
| २,४५,७३०.५५ | एकूण | | ३,६२,२१६.८५ |

ठिकाण मुंबई

दिनांक १-५-१९९५

माझ्या आज रोजीच्या अहवाला प्रमाणे

**मे. एस. आर. घेडिया** (शासकीय लेखापरिक्षक)

# पतपेढी मर्यादित

मुंबई–४०० ००४.
३१ मार्च १९९५ अखेर

| १९९३–९४ रुपये पैसे | जमा | | १९९४–९५ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **कर्जावरील व्याज** | | |
| २,३१,४१८.०० | मध्यम मुदत कर्जावरील व्याज | ३२४,४१९.६० | |
| — | ठेव तारण कर्जावरील व्याज | १४,४०५.९० | ३३८८२५.५० |
| | **गुंतवणुकीवरील व्याज** | | |
| ७८४.०० | मुंबई जिल्हा मध्य बँक लि. | | ३७८४.०० |
| | **इतर उत्पन्न** | | |
| ७७५७.३० | कर्ज फॉर्म व इतर | ९,८५०.४० | |
| ५७५९.२५ | कर्जावरील दंड व्याज | ९७४४.९५ | १९,६०७.३५ |
| १२.०० | मुंबई जिल्हा मध्य सह. बँक लि. (लांभाश) | १२.०० | |
| २,४५,७३०.५५ | एकूण | | ३,६२,२१६.८५ |

**श्री. ज्ञानेश्वर बापूसो वांगडे**
अध्यक्ष

**श्री. रामचंद्र बळीराम वाईकर**
उपाध्यक्ष

**श्री. भरत शिवराम पिंपळे**
चिटणीस

**श्री. रामचंद्र धोंडीबा वांगडे**
खजिनदार

# सरकारी लेखापरीक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित, या संस्थेचे सोबत जोडलेले ३१ मार्च १९९५, अखेरचे ताळेबंद व नफा–तोटा पत्रक तपासले असून अहवाल सादर करतो की,

१. माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या सपूर्ण ज्ञानाप्रमाणे/माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरुर जी ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२. माझ्या मते व मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे

अ. ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशेबी पुस्तकाशी जुळते असून सदर ३१ मार्च १९९५, या दिनांकाचे ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शविते. आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची/तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शविते.

ब संस्थेचे हिशेब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत. व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

३. माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियमानुसार आवश्यक असलेली हिशेबाची योग्य रितीने पुस्तके ठेवल्याचे आढळून आले आहे.


४. १९९४–९५ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरीक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

५. वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षण प्रतिवृत्तांतील भाग १ व भाग २ मधील दोषांस पात्र राहून देण्यांत येत आहे.

स्थळ–मुंबई.
दिनांक २७–४–९५

**मे. एस. आर. घेडीया ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकाऊन्टट

**(एस. आर. घेडीया)**
प्रोप्रायटर



# सरकारी लेखापरीक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित, या संस्थेचे सोबत जोडलेले ३१ मार्च १९९२, १९९३, १९९४, १९९५, अखेरचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तपासले असून अहवाल सादर करतो की,

१. माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या सपूर्ण ज्ञानाप्रमाणे/माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२. माझ्या मते व मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे

अ. ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशेबी पुस्तकाशी जुळते असून सदर ३१ मार्च १९९२, १९९३, १९९४, या दिनांकाचे ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शविते. आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शविते.

ब संस्थेचे हिशेब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत. व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

३. माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियमानुसार आवश्यक असलेली हिशोबाची योग्य रितीने पुस्तके ठेवल्याचे आढळून आले आहे.


४. १९९१-९२ ते १९९३-९४ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरीक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

५. वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षण प्रतिवृत्तांतील भाग १ व भाग २ मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यांत येत आहे.

स्थळ-मुंबई.
दिनांक ११-१-९५

**मे. एस. आर. घेडीया ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकाऊन्टट

**(एस. आर. घेडीया)**
प्रोप्रायटर



# संस्थेच्या लाभदाय ठेव योजना

## दामदुप्पट ठेव योजना

६६ महिण्यानंतर रक्कम दुप्पट (व्याज दर १३%)

| काळावधी | व्याज दर |
|---|---|
| ४६ दिवस | ९% |
| १ वर्ष | १०% |
| २ वर्ष | ११% |
| ३ वर्ष | १२% |
| ४ वर्ष | १२.५% |

## आवर्त ठेव योजना

| काळावधी | व्याज दर |
|---|---|
| १ वर्ष | १०% |
| २ वर्ष | ११% |
| ३ वर्ष | १२% |
| ४ वर्ष | १२% |
| ५ वर्ष | १३% |

आवर्त ठेव योजनेत दरमहा १० च्या पट्टीने किती ही रक्कम भरता येईल.

## दैनंदिन बचत ठेव योजना

| काळावधी | व्याज दर |
|---|---|
| १ वर्ष | ६% |
| २ वर्ष | ७% |
| ३ वर्ष | ८% |
| ४ व ५ वर्ष | ९% |

सभासदास कमीत कमी ५ / रुपये भरुन खाते चालू करता येईल. तसेच आर्थिक अडचन असल्यास जमा रक्कमेच्या ७०% कर्ज मिळण्याची व्यवस्था

## बचत ठेव योजना

प्रत्येक सभासदास स्वतःचे बचत खाते सुरु करता येते त्यावर ६% दराने व्याज दिले जाते.

**सभासदांनी संस्थेच्या विविध ठेव योजनेत भाग घेऊन संस्थेच्या आर्थिक उन्नतीकरिता सहकार्य करावे.**

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित मुंबई-४.

कार्यालय : १०, अतुल निवास, पहिला मजला, ७ वी खेतवाडी, मुंबई–४०० ००४.

## चौथा वार्षिक अहवाल सन १९९४–९५

बुक–पोस्ट

सभासद नं. ____________

प्रति.
श्री./श्रीमती ____________

____________

____________